चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

१४ में, २०१९

: 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

# आपला मुलगा हरविला हा निरोप मिळण्याआधीच तळोधी पोलीसांनी मुलाला सुखरूप पोहचविले घरी.

तळोधी येथील रहिवासी ४ वर्षाचा जय हा सकाळाच्या सर्व विधी आटपवुन आंघोळ, नास्ता, मस्त तयारी करून सुमारे ११ वाजता जवळपास घराबाहेर खेळत होता. खेळत असल्यामुळे त्याचे आई—वडील आपल्या घरात निश्चींत होते. आईवडीलांना हे ठावुक होते की, आपला बाळ बाहेर खेळत आहे....परंतु खेळण्यामध्ये धुंद असणारा जय हा खेळता खेळता अचानक तळोधी येथील बस स्टॉपवर येवुन पोहचला. लहानसा बाळ आणि खेळण्याच्या धुंदीमध्ये त्याला कळलेच नाही की आपण कोठुन—कुठे पोहचलो. मग काय लागला बाळ रडालया, गेला तो घाबरून, हे दृश्य पाहुन बस स्टॉप चौकातील चोवीस तास उन्हातान्हात उभा राहणारा वाहतुक पोलीस कर्मचारी याचे लक्ष त्या रळत असलेल्या बाळाकडे कडे वळले. त्याने लगेच त्याकडे धाव घेतली, जयला शांत करून विचारपुस करण्याचा प्रयत्न केला, पण तो फक्त ४ वर्षाचा असल्याने त्याला बरोबर बोलता येत नव्हते व तो जे बोलत होता हे त्या ट्राफिकवाल्या पोलीस काकांना कळत नव्हते. हे सगळे पाहुन जवळपास विचारपुस करण्यात आली.

जय हा एकदम चांगले कपडे मस्त तयारी टिकला पावडर लावुन असल्याने सगळयांना असे वाटत होते की, तो बस स्टॉप वर कोणासोबत तरी कुठेतरी जाण्यासाठी आला असावा. आणि तो गर्दी मध्ये आपल्या आईवडीलांच्या हातातुन सुटला असवा. जवळपास सगळीकडे शोध घेतला असता जय चा जवळीक कोणीच मिळुन आला नाही. शेवटी वाहतुक पोलीस काकानी जय ला पोलीस स्टेशनला घेवुन गेले. जय हा घाबरलेला असल्याने त्याचे रडणे थांबतच नव्हते. नंतर पोलीस स्टेशन येथील साध्या गणवेशातील महिला पोलीस कर्मचारी स्वाती दाताळे यांनी त्याला मायेची वागणुक देवुन त्याला चॉकलेट आणि खावु देवुन शांत केले. जय शांत तर झाला परंतु त्याला काही सांगता येत नव्हते. **प्रभारी अधिकारी तळोधी सपोनि श्री. रोशन शिरसाट** यांना आता प्रश्नच पडला. याचा आईवडीलाचा शोध घ्यायचा तर कसा. हा बाळ कुठला असेल कुठुन आला असेल काही कल्पनाच नाही. पण बाळाला तर त्याच्या आईवडीलांना सुपुर्त करायचेच आहे याचा विचारविनीमय सुरू झाला. तर मग काय लागले सर्व पोलीस काका कामाला. ठाणेदार साहेबांनी प्रथम आपल्या तळोधी या गावातच शोध घ्यायला सुरूवात केली.

याकरीता सफौ. राजेश मुडेवार, पोहवा सतिश नेवारे, पोशि दिलीप चौधरी व मपोशि स्वाती दाताळे यांचे मिळुन दोन पथक तयार करून जय ला घेवुन गावातच विचारपुस सुरू केली. फिरता फिरता जय ला घेवुन, पोलीस तळोधी येथील टिचर कॉलनी येथे पोहचले. येथे पोहचताच जय चे हावभाव बदलेले दिसले. त्याच्या चेह—यावर हासु उमटले, तो हात दाखवुन काही तरी सांगण्याचा प्रयत्न करू लागला. पोलीसांना क्षणभर असे वाटले की जय हा याच परिसरातीलच आहे की काय याचा विचार करत पोलीसांनी गाडी थाबंविली, पोलीस जवळपास विचारपुस करीत असतांना एक महिला काहीतरी शोधत शोधत पुढे येतांना दिसली. पोलीस त्यांना काही विचारणाच की लगेच त्या महिलेनी त्यांना विचारले की माझा जय पोलीसांच्या गाडीत काय करत आहे. काय झाला तुम्ही याला कशाला बसविले अशी विचारणा जयची आई करू लागली. पोलीसांनी सगळा घडलेला प्रकार जयच्या आईला सांगीतला. मग काय जय ची आई वडील एकदम चक्क, गेले एकदम घाबरून, ऐवढा सगळा प्रकार संपुर्ण गावात चालु होता, परंतु त्यांना अजुन ठावुकच नाही की त्यांचा जय हरविलेला आहे. आपला मुलगा खेळता खेळता निघुन गेला आणि आपल्याला माहितच नाही. जय चे वडील नितिन बोधुले आणि त्यांची पत्नी हे आता आपल्या बाळाला सुखरूप पोलीसांकडे पाहुन त्याचे मण भरून आले. त्यांनी पोलीसांचा हा कर्तव्यदक्षपणा आणि बाळाला आपल्या जिवनदाता कडे पोहचविण्याची इच्छा आणि जिदद् पाहुन पोलीसांना धन्यवाद कसे करायचे याकरीता त्यांचे कडे शब्दच नव्हते, होते ते फक्त गहिवरलेले मन व पानावलेले डोळे. पोलीसांनी जय ला सुखरूप त्याचा आईवडीलांना सोपावुन निश्वास सोडला व आपल्या दैनंदिन कामा करीता आपले वाटेवर रवाना झाले..

———————————————————————————————————